राष्ट्रीय एकात्मता

आणि

इस्लाम

लेखक

डॉ. अब्दुल हक अन्सारी

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

भूमिका

धर्मविषयी आस्था न राखणाऱ्या काही धर्मविरोधक तत्त्वांनी जनसामान्यांत अशी भ्रम-भावना निर्माण केली आहे की धर्म राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सौजन्याच्या मार्गात एक फार मोठा अडथळा आहे. विशेषत: इस्लाम धर्म! इस्लाम धर्माला अलगाववादी धर्म आणि मुस्लिमांना इतर धर्मांच्या बाबतीत अनुदार असहिष्णु असल्याचा अपप्रचार पद्धतशीरपणे केला गेला आहे. वास्तविक या अपप्रचारांमध्ये सत्याचा लवलेशही नाही.

एक थोर विद्वान आणि विचारवंत डॉ. अब्दुल हक अन्सारी यांनी आपल्या या संक्षिप्त लेखात त्या स्वार्थी तत्त्वांची आणि इस्लामविरोधी अपप्रचार करणाऱ्यांच्या कूटनीतीची व दुष्ट भावनांची सखोल मीमांसा केली आहे. आणि हे दर्शविले आहे की त्यांचा बोलविता धनी कोण आहे. तसेच घागरीत सागर सामावलेल्या या लेखात इस्लामी शिकवणींचे निवडक परिच्छेद सादर करीत हे स्पष्ट केले आहे की इस्लाम देशावर प्रेम करण्याचा, इतर धर्मांचा आदर-सन्मान करण्याचा आणि इतर कोणत्याही धर्माच्या आराध्यदैवतांचा आणि धार्मिक महापुरुषांचा आदर राखण्याचा आदेश देतो.

'सर्वधर्मसमभाव' या तथाकथित भावना बाळगणाऱ्यांच्या नीतिमत्तेत आढळून येणाऱ्या उणिवांवर प्रकाशझोत टाकण्याचा विद्वान लेखकाने आपल्या या लेखात सफल प्रयत्न केला आहे. आणि राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय सौजन्य तसेच धार्मिक एकात्मता आणि धार्मिक सहिष्णुतेच्या मार्गात खरा अडथळा कोणता आहे याकडे अंगुलीनिर्देश केला आहे. आणि असे अनेक महत्त्वपूर्ण उपाय सुचविले आहेत, जे सौजन्य, सहिष्णुता व एकात्मता साध्य करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरू शकतात.

विद्वान लेखकाने त्या लोकांच्या नैतिकतेवर ही चर्चा केली आहे, जे घोषणा तर 'सर्वधर्मसमभावा'ची करतात, परंतु राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सौजन्यतेच्या नावाने एका विशेष धर्माला आणि विशेष संस्कृतीला सर्व देशवासींवर लादण्याचा धूर्त प्रयत्न करतात.

प्रस्तुत लेख मूळ उर्दू भाषेत होता, जो एका सेमिनारमध्ये वाचला गेला. नंतर त्या लेखास पुस्तकाचे रूप देऊन 'कौमी यक जहती और इस्लाम' या नावाने प्रकाशित केले गेले. त्यानंतर या पुस्तकाचे हिंदी रूपांतर 'राष्ट्रीय एकता और इस्लाम' या नावाने प्रसिद्ध झाले. हा त्याच पुस्तकाचा मराठी अनुवाद होय, जो आपल्या हातात आहे. भाषांतर

करताना भाषाशैली सहज-सुगम व सरळ राखण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला गेला आहे, त्याचबरोबर मूळ लेखात ज्या विश्वासपूर्ण, प्रवाहपूर्ण आणि हृदयस्पर्शी शब्दांचा प्रयोग केला गेला आहे, भाषांतरात त्याची मौलिकता कायम राखण्याचा पुरेपूर प्रयत्न केला गेला आहे.

आम्ही सर्व शक्तिमान अल्लाहला प्रार्थना करतो की तो या पुस्तकाला आपले ध्येय साध्य करण्यात यशस्वी करो आणि आमच्या प्रिय देशाला एक नवी दिशा प्रदान करो.

(तथास्तु)

- अनुवादक

बांधवांनो!

मी आपल्या लेखात, प्रथम या समस्येवर चर्चा करेन की देशाच्या विभिन्न धर्मांच्या दरम्यान कोणत्या गोष्टीत एकमत आहे, त्यांच्यात एकमत व एकसूत्रता आहे तर कोणत्या गोष्टीत? आणि मतभेद आहे तर कोणत्या बाबतीत? याचबरोबर मी 'सर्वधर्मसमभावा'च्या काही दृष्टिकोनांची समीक्षा सादर करेन, जो आमच्या परिसंवादाचा विषय आहे.

यानंतर मी या विषयावर चर्चा करेन की भिन्न धर्मांच्या दरम्यान ज्या गोष्टीत एकमत आहे, त्या गोष्टी त्या धर्माच्या अनुयायींना कशा प्रकारे एकमेकांच्या जवळ आणू शकतात. आणि कितपत राष्ट्रीय एकात्मता आणि शांतीपूर्ण जीवनाच्या त्या ध्येयप्राप्तीत सहाय्यक ठरू शकतात, जे ध्येय आम्हा सर्वांना प्रिय आहे. आणि शेवटी त्या गोष्टीचा उल्लेख करेन की, या एकमेकांना जोडणाऱ्या गोष्टींविषयी इस्लामचे कथन काय आहे आणि ती मौल्यवान उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी इस्लाम कोणती कार्ये करू शकतो.

- डॉ. अब्दुल हक अन्सारी

धर्मांधर्मात एकमत कोणकोणत्या गोष्टीत आहे?

जर आम्ही खुल्या दिलाने धर्मांचा अभ्यास केला आणि पूर्वग्रह दूषितता बाजूला ठेवून केवळ या हेतूने त्यांच्यावर नजर टाकली की त्यांच्या दरम्यान कोणकोणत्या गोष्टी एकसमान आहेत, तर सर्वप्रथम आम्हाला हे दिसून येईल की आमचे सर्व धर्म मानवी जीवनाच्या सामान्य आणि नैतिक मूल्यांबाबत सहमत आहेत. उदाहरणार्थ, सर्वच धर्म सत्य, न्याय, वचन पालन आणि विश्वस्ततेला भले जाणतात आणि खोटे, असत्य, अन्याय, अत्याचार वचनभंग आणि धोकेबाजीला दुराचार समजतात. सहानुभूती, दया, क्षमा, सहृदयता इत्यादी गुणांचा सर्वच धर्म आदर करतात आणि स्वार्थलोलुपता, पाषाण हृदयता, कृपणता आणि संकुचित मनोवृत्तीला तुच्छ लेखतात. धैर्य, स्थिरता, आत्मसंयम, मृदुता आणि परोपकारिता व सज्जनता वगैरे गुण सर्वांच्याच दृष्टीने उत्कृष्ट गुण आहेत. अधीरता, संकुचित हृदयता, तुच्छहीन इच्छा-आकांक्षाचे दास्यत्व, रूक्ष व कठोर स्वभाव आणि चरित्रहीनता इत्यादी गोष्टी सर्वांच्याच दृष्टीने फार वाईट गोष्टी आहेत. कर्तव्याची जाण राखून कर्तव्यपूर्तीस तत्पर राहणे, सतर्क राहणे, जबाबदारीची जाणीव राखून परिश्रम करणे सर्वांना प्रिय आहे आणि अपहरण, कामचुकार वृत्ती, आळशीपणा आणि बेपर्वावृत्ती सर्वांच्या नजरेत निंदनीय आहे.

तद्वतच सारे धर्म चांगल्या सामाजिक जीवनाच्या निर्मितीकरिता नियमबद्धता, अनुशासन, सहयोग, परस्पर सहयोग, स्नेह-प्रेम, शुभचिंतन आणि सामाजिक न्यायाला अनिवार्य समजतात आणि गटबाजी, फूट, अव्यवस्था, अहितचिंतन, अन्याय, अत्याचार आणि उपद्रवकारितेस घातक ठरवितात. चोरी, व्यभिचार, हत्या, दरोडा, धोकेबाजी, लाचखोरी आणि अपहार वगैरे सर्वांच्या नजरेत घोर अपराध आहेत. शिव्याशाप, उत्पीडन, निंदानालस्ती, चुगली, ईर्ष्या-मत्सर, खोटा आरोप ठेवणे आणि उत्पात पसरविणे सर्व धर्मांच्या दृष्टीने सक्त अपराध आणि महापाप आहे. मातापित्याशी सद्व्यवहार, नातेवाईकांना मदत करणे, शेजाऱ्यांशी उपकार व सद्व्यवहाराचे आचरण, मित्रांशी स्नेह-सलोखा, दीनदुबळयांचे समर्थन, अनाथ आणि अगतिक लोकांची विचारपूस करणे, रुग्णांची शुश्रूषा आणि संकटग्रस्त लोकांची सहाय्यता इ. गोष्टी सर्वजण भलेपणाची कामे समजतात.

कसल्याही अपवादाविना प्रत्येक धर्माचा उद्देश असा समाज निर्माण करणे होय, ज्यात सत्यनिष्ठ, सदाचारी, नम्र स्वभावाचे आणि भल्या विचारसरणीचे लोक असावेत.

ज्यांचे अंतर्बाह्य स्वरूप एक समान, जे आपल्या हक्कांबाबत समाधानी आणि इतरांचा हक्क अदा करण्यास तत्पर व विशाल हृदयी असावेत. जे स्वत:ही शांतीने राहून इतरांनाही शांतीपूर्वक राहू देणारे असावेत. ज्यांच्या व्यक्तिमत्त्वापासून प्रत्येकाला भलाईची अपेक्षा असावी आणि ज्यांच्याकडून कोणाला दुराचाराचे भय नसावे.

मनुष्य-जीवन आणि समाजाच्या या सर्वसामान्य मर्यादा कोणत्याही धर्मविशेषासाठी नाहीत. ती सर्व धर्मांची सामायिक संपत्ती आहे आणि प्रत्येक धर्म यांच्या संदर्भात एक विस्तृत आणि व्यापक दृष्टिकोन बाळगतो. कोणताही धर्म या नीतिमूल्यांबाबत आपला-परका असा भेद योग्य समजत नाही. कोणताही धर्म असे शिकवत नाही की न्याय, शुभचिंतन, सहानुभूती आणि प्रेम केवळ आपल्याच धर्माच्या लोकांशी राखा आणि इतर धर्माच्या लोकांशी अन्याय, अत्याचार पूर्ण व द्वेषपूर्ण व्यवहार राखून त्यांना आपले शत्रू माना. आपल्या समुदायाच्या लोकांचे प्राण, त्यांची प्रतिष्ठा व संपत्तीचे रक्षण करा आणि इतर समुदायाच्या लोकांची मालमत्ता लुटा, त्यांच्या जमीन जायदादी हडप करा व त्यांच्या घरादारांना आग लावून त्यांच्या संसाराची राखरांगोळी करा. त्यांच्या तरुणांची व निष्पाप बालकांची अकारण हत्या करा आणि त्यांच्या आया-बहिणींची, स्त्रियांची इज्जत लुटा. ही क्रूरता जगातील कोणताही धर्म शिकवत नाही.

स्वजनांशी आणि इतरांशी वर्तन करण्यात जर एखाद्या अर्थाने धर्मांनी फरक केला आहे तर तो इतकाच की आम्ही आपल्या धर्माच्या लोकांशी, इतरांच्या तुलनेत अधिक चांगले वर्तन अंगिकारावे. जास्त प्रेम, त्याग आणि बलिदानाच्या भावनेने वागावे. परंतु कोणत्याही धर्माने या गोष्टीची अनुमती मुळीच दिली नाही की आपल्या लोकांशी सद्व्यवहार करण्यासाठी आम्ही इतरांचा हक्क गिळंकृत करावा. आपल्या लोकांना खूष राखण्याकरिता इतरांची धन संपत्ती लुटून घ्यावी आणि आपल्या सामर्थ्य व प्रगतीकरिता इतरांना दुर्बल व अपमानित करावे.

प्रत्येक धर्माची अशी धारणा आहे की, या सर्वसामान्य मर्यादांमध्ये जे सद्‌गुण आहेत ते मानवाची श्रेष्ठता आणि सज्जनतेचे आदर्श होत आणि जे दुर्गुण आहेत ते मानवाच्या तिरस्कार व अधर्मतेचे प्रतीक होत. मानव सद्‌गुणांची कास बाळगून सत्कर्मे करून महान बनतो आणि दुष्कर्म करीत राहिल्याने अधर्मी व तिरस्करणीय ठरतो.

प्रत्येक धर्माची ही आस्था आहे की ती सत्कर्मे केल्याविना आणि या दुष्कर्मांपासून अलिप्त राहिल्याविना कोणताही मनुष्य मुक्ती किंवा मोक्ष प्राप्त करू शकत नाही. मोक्षप्राप्तीच्या अटी आणि अत्यावश्यक अपेक्षा कोणत्या आहेत, याविषयी धर्माधर्मात मतभेद आहेत. परंतु या गोष्टीवर सर्वांचे एकमत आहे की या दुराचारापासून दूर राहणे आणि या सत्कर्मांना करत राहणे, ज्याचा उल्लेख आम्ही वर केला आहे. प्रत्येक माणसाच्या मुक्ती किंवा मोक्षाकरिता अत्यावश्यक आणि अनिवार्य आहे.

तसेच प्रत्येक धर्माची ही शिकवण आहे की हे सर्व सद्‌गुण निष्ठापूर्वक आत्मसात करून सत्कर्मे करावीत आणि दुराचारांपासून सच्च्या मनाने अलिप्त राहावे. जर अनावधानाने तसे घडल्यास तौबा (क्षमायाचनापूर्वक पुन्हा तसे न करण्याचा दृढ संकल्प) करावा. वरकरणी देखाव्याची भावना, लाभाची एखादी अपेक्षा किंवा हानी होण्याचे भय आमच्या सत्कर्मांसाठी प्रेरक नसावेत. आम्ही सत्कार्य करावे तर भलेपणाच्या हेतूने किंवा केवळ अल्लाहची प्रसन्नता व त्याचे असीम प्रेम संपादण्याकरिता आणि दुराचारापासून दूर राहावे तर कोणाच्या दबावाखाली किंवा सामर्थ्यापुढे मान झुकवून नव्हे तर केवळ दुष्कर्म समजून किंवा सर्वशक्तिमान अल्लाहची अप्रसन्नता व त्याच्या कोपाच्या भयाने दूर राहावे.

लोकांची आत्मोन्नती आणि समाज नवनिर्माणासंबंधी धर्मांचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. परंतु यासंदर्भात कोणताही धर्माचा मतभेद नाही की व्यक्तीच्या आत्मोन्नतीचा एखादा कार्यक्रम किंवा समाजसुधारणेची एखादी योजना, या नैतिक मूल्यांचा अंगीकार केल्याविनाही यशस्वी होऊ शकते. जप-तप, भक्ती-आराधना या गोष्टींशी काय अभिप्रेत आहे? याबाबतही धर्मांच्या दरम्यान मतभेद आहे. परंतु या गोष्टीवर सर्वांचे एकमत आहे की या कर्मांचे जे काही उद्देश असोत, यांचा एक महान उद्देश हा अवश्य आहे की मानवाचे मन मस्तिष्क, अधिकार आणि वैचारिकता अशा प्रकारे प्रशिक्षित व्हावी की मानवतेची समस्त भलाई त्याला प्रिय आणि मनमोहक वाटू लागावी. आणि ही सत्कर्मे करण्यास तो स्वत: प्रवृत्त व्हावा. आणि मानवतेच्या सर्व सामान्य वाईट गोष्टींविरुद्ध त्याच्या अंतर्यामी अशी तीव्र घृणा निर्माण व्हावी की त्या दुर्गुणांपासून त्याचा स्वभाव आपोआप दूर राहू लागावा. सत्कर्म करून माणसाला एका वेगळयाच आनंदाची अनुभूती व्हावी आणि जर अनावधानाने एखादे दुष्कर्म हातून घडल्यास तर त्यावर तो लज्जित व्हावा.

धर्माच्या दरम्यान या बाबतीतही एका मर्यादेप्रत मतभेद आहे की पूजापाठ, ध्यान-ज्ञान, तपस्या आणि साधना यांच्या तुलनेत मानवाशी सहानुभूती, स्नेह, प्रेम,

उपकार आणि त्यागपूर्ण वर्तनाचे केवढे महत्त्व आहे, परंतु याबाबत कोणत्याही धर्माचे मतभेद नाहीत की या नैतिकगुणांमध्ये कमतरता अन्य कोणत्याही गोष्टीने भरून काढता येणार नाही. पूजापाठ आणि नमाज-रोजाची अधिकता (धार्मिक) यात्रा किंवा जियारत, गंगास्नान आणि हज यात्रांनी त्या सत्कर्म आणि भलेपणाच्या कृत्यांची उणीवपूर्ण होत नाही की सदाचारांविरुद्ध दुराचाराचा अभिशाप दूर होत नाही.

धर्मांमधील मतभेद आणि त्याचा प्रकार :

विभिन्न धर्मांच्या दरम्यान ज्या गोष्टी परस्परसदृश आहेत, त्या याच मानवीय आणि नैतिक मर्यादा आहेत, ज्यांचा उल्लेख मी वर केला. यांच्याव्यतिरिक्त ज्या गोष्टी समानरूपी असू शकतात, त्या औपचारिक (Formal) अधिक आहेत, सत्यनिष्ठ आणि सकारात्मक कमी. मी ही गोष्ट स्पष्ट करीत निवेदन करीन.

प्रत्येक धर्मात ही जाणीव समानरीत्या आढळून येते की हा निसर्गाचा कारखाना आणि मानव अस्तित्व केवळ नैसर्गिक विज्ञानाचा विषय नाही. आणखी काही तथ्ये आहेत, जी विज्ञानाच्या कक्षेत येत नाहीत. ही सांप्रत विश्वव्यवस्था आत्मनिर्भर नाही. यापलीकडेही एक सत्य आहे. या गोष्टीची जाणीव प्रत्येक धर्माला आहे, परंतु जेव्हा हा प्रश्न उद्‌भवतो की ते निसर्गापलीकडचे सत्य काय आहे? एक आहे की अनेक? ते कोणत्या गुणांनी युक्त आहे? आजचे विश्व आणि मानवाशी त्याचा काय संबंध आहे? तेव्हा या मूलभूत समस्यांच्या संदर्भात प्रत्येक धर्माचा मार्ग वेगळा होतो.

इस्लामच्या दृष्टीने हे निसर्गापलीकडचे तथ्य, एक असे चिरस्थायी अस्तित्व आहे, जो चेतना, ज्ञान आणि सामर्थ्यसत्तेत अद्वितीय आहे. या सृष्टीचा तोच रचयिता आहे आणि तोच नियंतादेखील आहे आणि तोच या सृष्टीचा प्रबंधक आणि शासकही आहे. मनुष्य वस्तुतः आत्मा आणि शरीराचा एक विलक्षण योग आहे. त्याला मर्यादित स्वरूपात ज्ञान, सामर्थ्य आणि संकल्पशक्ती लाभली आहे. परंतु गुणांची एकरूपता असतानाही तो सृष्टीनिर्मात्या (अल्लाह)ची रचना आणि त्याचा दास मात्र आहे. त्याच्या ईशत्वात त्याचा अणुमात्र सहभाग नाही. आपले अस्तित्व, अधिकार आणि कर्म याबाबत तो अल्लाहवर अवलंबून आहे आणि त्याच्या आदेशाच्या अधीन आहे. त्याचे अत्युच्च सद्‌भाग्य आपल्या निर्माणकर्त्या अल्लाहच्या आज्ञापालनात व प्रेमात सामावले आहे. अर्थात अल्लाहविषयीची इस्लामची ही श्रद्धा, विशुद्ध एकेश्वरत्वाची श्रद्धा आहे.

एकेश्वरत्वाची ही श्रद्धा ज्यू धर्माचीही श्रद्धा आहे आणि हीच श्रद्धा सुरुवातीला ख्रिश्चन धर्मातही होती. त्या सुरुवातीच्या काळात हजरत ईसा मसीह (येशू) (अ.)ची योग्यता अल्लाहचे एक आज्ञाधारक दास आणि एक महान ईश-संदेशवाहका (पैगंबर)ची होती. परंतु कालांतराने या विशुद्ध एकेश्वरत्वाचे स्थान 'त्रिदेववादा'(Trinity)च्या श्रद्धेने घेतले.

'झर' देखील एकेश्वरत्वाचे ध्वजरोहक होते; परंतु त्यांच्या संप्रदायातदेखील हळूहळू परिवर्तन होत गेले आणि आज त्यांचे अनुयायी सत्कर्म, दुष्कर्म आणि प्रकाश-अंधकाराच्या दोन कायमस्वरूपी आणि समानांतर सत्तांवर श्रद्धा ठेवतात आणि सृष्टी व मानव इतिहासाला याच दोन परस्परांशी झुंजत असलेल्या शक्तींच्या संघर्षाचा परिणाम ठरवितात.

जैन धर्म आत्म्याला एक चिरस्थायी अनादिकाळाची आणि चिरंतन सत्ता ठरवितो, जी नकळत 'अनात्म'शी संलग्न होऊन जीवनाच्या एका अनंत परिपाठात जखडली गेली आहे. ही सकलसृष्टी आणि त्यातली प्रत्येक चीजवस्तू, मग ती कितीही अवजड आणि अविवेकी असो, आत्म्याच्याच वेगवेगळया पतन आणि उत्थानासंबंधीच्या अवस्थांचे नाव आहे. हे आध्यात्मिक तथ्य एक नाही तर अगणित आत्मा होत आणि त्या असंख्य आत्म्यांहून उच्चतम अन्य काहीही नाही, ज्याला आम्ही ईश्वर म्हणून संबोधावे. सर्वसामान्यपणे ज्या गुणसामर्थ्यांनी ईश्वराला आभूषित केले जाते, जैन धर्म त्या गुणसामर्थ्यांना त्या आत्म्यांशी जोडतो, जे 'अनात्म'च्या पापांपासून नेहमीकरिता मुक्त झाले आहेत.

बौद्ध धर्मात वेगवेगळे पंथ-संप्रदाय आहेत आणि सत्यासंबंधी त्यांची श्रद्धा तत्त्वे परस्परभिन्न आहेत. त्यांच्या सर्वात मोठ्या संप्रदायाच्या मते कोणतेही सत्य पतनहीन नाही. मनुष्य-चेतना क्षणा-क्षणाच्या चैतनांचे एकापाठोपाठ प्रकटणाऱ्या आपत्तींचा एक अमर्याद क्रम आहे, ज्याला सत्य म्हटले जाते ते या क्रमाखेरीज आणखी काही नाही. या क्रमाचे भंग पावणे, मानवी प्रयत्नांचे ते अंतिम उद्दिष्ट होय, ज्याला 'निर्वाण' म्हणतात. काही पंथांच्या मते निर्वाण अगदी नकारात्मक नाही, तर एक असे तथ्य आहे, ज्याला जाणून घेणे व ज्याचे शब्दांत वर्णन करणे शक्य नाही.

हिंदू धर्माचे एखादे निर्धारित चिंतन नाही. त्यात एकेश्वरत्व, द्वैतवाद आणि बहुदैववाद या सर्व धारणा आढळतात. येथपावेतो की, उघड नास्तिकता आणि ईश्वराचा नकारात्मक दृष्टिकोनही हिंदू धर्मात समाविष्ट आहे. परंतु सर्वसाधारण हिंदू धर्मात एका महान परमेश्वराची कल्पना प्रभावशाली राहिली आहे. ईशत्व त्याच्याकरिता खास मानले गेले नाही आणि आकाश व जमिनीच्या अगणित चीज वस्तूंना ईश्वराच्या ईशत्वात सहभागी ठरवले जात राहिले. या धारणेला हिंदू धर्मात इतकी व्यापकता दिली गेली आहे की शेवटी ईश्वर आणि अन्य चीजवस्तूंच्या अस्तित्वात कसलाही मूलभूत फरक बाकी राहू शकला नाही. सृष्टीनिर्माता आणि सृष्टी, ईश्वर आणि दासामधील तो शाश्वत आणि पतनहीन फरक, जो इस्लाम आणि ज्यू धर्मात सर्वमान्य आहे. हिंदू धर्म त्याचा इन्कार करतो. काही संप्रदायांच्या मते वास्तविकता एक अपौरुषेय अस्तित्व आहे. सृष्टीचा प्रत्येक कण आणि मानवजातीची प्रत्येक व्यक्ती त्याच अपौरुषेय अस्तित्वाचे मर्यादित प्रदर्शन आहे. सर्वसामान्य हिंदू बांधव ज्याला भगवान म्हणतो, तोदेखील त्या लोकांच्या मते त्या परिपूर्ण तथ्याचे एक निश्चित अवलोकन आहे. मानव विकासाची सर्वात उंच मजल, अबाधित सत्याचे ज्ञान व त्याची प्राप्ती होय.

धर्मांच्या दरम्यान सत्य, विश्व आणि मानवाविषयी हे मतभेद आधारभूत आणि वास्तविक आहेत. या मतभेदांचा प्रभाव त्यांच्या समग्र व्यवस्थेवर संपूर्णत: किंवा त्याच्या लहान-मोठ्या भागांवर वेगवेगळे पडतात. धर्मांचे उदाहरण भिन्न-भिन्न प्रकारच्या वृक्षांसमान आहे. वास्तविक सर्व प्रकारची झाडे या दृष्टीने एक समान आहेत की प्रत्येक झाडाला मुळे, खोड, फांद्या, पाने, फुले आणि फळे असतात. परंतु ही बाह्य समानता असूनही वस्तुत: प्रत्येक झाड दुसऱ्या प्रकारच्या झाडाहून वेगळे असते. अशा प्रकारे बाह्य समानता असूनही प्रत्येक धर्म सत्याविषयी आस्था राखण्यात, त्याच्याशी संपर्क स्थापित करण्याच्या उपायात व मनुष्यजीवनाचे ध्येय-उद्दिष्ट प्राप्त करण्याच्या मार्गात एकमेकाहून भिन्न आहेत.

उदाहरणार्थ, भक्ती-उपासनेच्या पद्धतींवर विचार करा, ज्यांना आचरणात आणून धर्मानुयायी आपापल्या धर्माच्या उच्च तथ्यांशी संपर्क स्थापित करतात. ज्या धर्मांमध्ये सर्वात मोठे सत्य एक अपौरुषेय अस्तित्व आहे आणि मानवाशी त्याचा संबंध एक अमर्याद सत्य आणि त्याच्या मर्यादित समावेशाचा आहे. त्यांच्यात चिंतना (Meditation)ला आधारभूत महत्त्व आहे. याउलट ज्या धर्मांमध्ये अल्लाहविषयी कल्पना पौरुषिक आहे आणि मानवाशी त्याचा संबंध स्वामी आणि दासाचा आहे. त्यांच्यात उपासना, जप प्रार्थना अतिशय महत्त्वपूर्ण भक्ती होय.

अशाच प्रकारे ज्या धर्मांमध्ये आत्म्याला एका भौतिक शरीरात बंदिस्त समजले गेले आहे आणि दोघांच्या दरम्यान संघर्षाला मूलभूत सत्य ठरविले गेले आहे, त्यांच्यात त्याग, इंद्रिय दमन आणि तपश्चर्येला आत्मविकासाकरिता अनिवार्य ठरविले गेले आहे. याउलट ज्या धर्मांमध्ये आत्मा व शरीराच्या परस्पर सहयोगाला महत्त्व दिले गेले आहे आणि मनुष्य आत्म्याचा आदर्श, पृथ्वीवर अल्लाहचे साम्राज्य आणि त्याच्या श्रेष्ठत्वाची स्थापना ठरविले आहे. त्यांनी ऐहिक जीवनसामग्रीने लाभान्वित होण्याची, ईश-स्मरण आणि उपासना तसेच सामाजिक व सामूहिक सर्व कार्यात संकल्प आणि संतुलन राखण्याची शिकवण दिली आहे.

धर्मा-धर्मातील मतभेद फक्त श्रद्धा उपासना आणि आत्मविकासाच्या पद्धतीपर्यंतच मर्यादित नाहीत, तर त्यांच्या मूल्यप्रणाली आणि जीवनव्यवस्था दोघांतही आहे. उदाहरणार्थ, एका धर्मात अहिंसा मूलभूत श्रद्धा आहे. दुसऱ्या धर्मात ती केवळ एक मर्यादा आहे. एका धर्मात नग्नता, त्याग, ब्रह्मचर्य हे आत्म-संयमाचा आदर्श आहे. तर हे दुसऱ्या धर्मात एक अप्रिय आणि तिरस्कृत कर्म आहे. एका धर्माच्या धारणेनुसार मनुष्य जन्मतःच कुलीन आणि नीच असतो. आणि मरेपर्यंत याच स्थितीत राहतो. मात्र दुसऱ्या धर्माच्या धारणेनुसार मानवाची सर्व संतती समान रूपाने आदर- सन्मानास योग्य आणि प्रिय आहे; मग ती कोणत्याही घरात किंवा वंशात जन्म घेत असो. एकाच्या दृष्टीने भेदभाव आणि उच्च-नीचतेचा फरक वास्तविक आहे आणि समानता अस्थायी स्वरूपाची, मात्र दुसऱ्याच्या दृष्टीने समानता वास्तविक आहे आणि भेदभाव, उच्च-नीचता समाजाने स्वतःच निर्माण केलेली वाईट गोष्ट आहे.

सर्वधर्मसमभावाचा दृष्टिकोन :

काही लोक मी वर उल्लेखिलेल्या संकेतांना सत्यनिष्ठ समजत नाहीत. ते यांना आमच्या बाह्यावलोकन आणि दृष्टिदोषाचा परिणाम दर्शवितात. मी त्या लोकांच्या निष्ठेवर शंका घेत नाही, परंतु मी त्यांच्या विचाराशी सहमत नाही. धर्मांच्या दरम्यान ज्या ज्या गोष्टीत वस्तुतः एकमत आहे. त्यांचे आधीच्या पृष्ठांमध्ये मी सविस्तर वर्णन केले आहे. त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही विषयात मला एकमत दिसून येत नाही. मग ज्या गोष्टींमध्ये मला एकमत आढळते, ते माझ्या दृष्टीने प्रत्येक धर्माचे महत्त्वपूर्ण आणि मूलभूत अंग आहे आणि हे मी वारंवार स्पष्ट केले आहे. तद्वतच ज्या गोष्टींमध्ये मला

मतभेद आढळतो तोही महत्त्वाच्या आणि मूलभूत आहे. धर्मांच्या दरम्यान एकमतही वास्तविक आहे आणि मतभेदही वास्तविक आहे. ना मतभेद उथळ दृष्टीचा परिणाम आहे आणि ना एकमत सुधारणेचे फळ. माझ्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि महत्त्वहीन, मौलिक आणि अमौलिक यांचा मापदंड वस्तुपूरक असतो. आम्ही प्रत्येक धर्माच्या अशा त्या प्रत्येक गोष्टीस महत्त्वपूर्ण व मूलभूत म्हणण्यास तयार आहोत, ज्याला त्या धर्माचे अनुयायी महत्त्वपूर्ण समजतील आणि अशा त्या प्रत्येक गोष्टीला महत्त्वहीन जाणतो, जिला त्या धर्माचे लोक महत्त्वहीन म्हणतात. डॉ. भगवानदास यांनी आपल्या 'द इसेन्शिअल युनिटी ऑफ ऑल रिलिजन्स' (The Essential Unity of all Religions) या पुस्तकात हा दृष्टिकोन मांडला आहे की धर्म केवळ मूलभत मूल्यांबाबत सहमत नाहीत, तर श्रद्धा उपासना, नैतिकता आणि सामाजिक सिद्धान्तांमध्येही त्यांच्या दरम्यान मूलत: सहमती आहे. त्यांच्यात असलेल्या मतभेदांचा संबंध महत्त्वहीन गोष्टींशी आहे. त्यांच्या मते समस्त मानवजातीचा एक मूलभूत धर्म आहे, जो प्राचीन आणि सार्वकालीन आहे (आणि हा अंश सर्वच धर्मांमध्ये अस्तित्वात आहे. बाकी अंग तात्पुरते आणि काही काळापुरते आहेत.) त्यांच्या विचारानुसार सर्व धर्मांनी आपल्या महत्त्वहीन आणि सामायिक मतभेदांना विसरून त्या उभयनिष्ठ प्राचीन आणि सार्वकालीन धर्मावर एकत्र जमले पाहिजे. याच संयुक्त आधारावर जीवनाची पुनश्च निर्मिती झाली पाहिजे आणि यातच मानवाची मुक्ती आहे.

त्या पुरातन आणि शाश्वत धर्माचे जे विश्लेषण मान्यवर लेखकाने केले आहे, त्याचा सारांश हा की आजचे विश्व वस्तुत: एका महान अपौरुषिक अस्तित्वाचा प्रादुर्भाव आहे. सर्व चीजवस्तू आणि सगळे मानव त्या अपौरुषिक आणि अमर्याद अस्तित्वाचे मर्यादित प्रकट रूप होय. मानवाचे सर्व प्रयत्न आणि संघर्षाचे अंतिम उद्दिष्ट आपल्या व्यक्तिगत आणि अंशत: अस्तित्वाला त्या अवैयक्तिक आणि संपूर्ण अस्तित्वात विलीन करणे आहे. आणि त्यात मिसळून अशा प्रकारे असीमित होणे, ज्या प्रकारे थेंब समुद्रात मिसळून अमर्याद होतो. यातच मानवाचे कल्याण आणि मुक्ती आहे.

हा अद्वैतवाद एक तत्त्वज्ञान या नात्याने कोणते महत्त्व बाळगतो? हा प्रश्न वेगळा, तद्वतच हा ही प्रश्न वेगळा आहे की काही साधुसंत आणि सूफी औलिया या दृष्टिकोनास आपल्या आध्यात्मिक आणि रुहानी घटनांशी कितपत अनुकूल असल्याचे जाणतात? परंतु जेथपावेतो ऐतिहासिक धर्माचा संबंध आहे, त्यापैकी कोणत्याही धर्माची

आधारशिला या अद्वैतवादावर ठेवली गेली नाही. जेथपावेतो इस्लामचा संबंध आहे, त्यात अल्लाहविषयीची श्रद्धा एका वैयक्तिक अस्तित्वाची आहे आणि अल्लाह व मनुष्यामधील संबंधाचा प्रकार स्वामी आणि दास यांच्यातील वैयक्तिक संबंधाचा आहे. इस्लामनुसार मानवाचे सर्वोच्च ध्येय आपल्या कणरूपी अस्तित्वाला लीन करून अल्लाहच्या अमर्याद अस्तित्वात मिसळून जाणे नव्हे, तर त्याचे आज्ञापालन करणे आणि श्रद्धापूर्वक प्रसन्नता शोधण्याच्या माध्यमान्वये त्याच्याशी आणखी जवळ राहून आपल्या वैयक्तिक अस्तित्वास पूर्ण करणे होय. डॉ. भगवान दास यांनी इस्लाम धर्माचा अभ्यास करताना मुस्लिम सूफी संतांच्या एका मर्यादित गटाला आपल्यासमोर ठेवले आहे. त्यांनी जर संपूर्ण इस्लामी आध्यात्मिकतेचा अभ्यास केला असता तर आपल्या अद्वैतवादाला मुस्लिम सूफी संतांचा दृष्टिकोन ठरविले नसते आणि त्यांनी जर पवित्र कुरआन व पैगंबर चरित्राचा अभ्यास केला असता तर कदापि या दृष्टिकोनाचा संबंध इस्लामशी जोडला नसता.

डॉ. भगवान दासचा अद्वैतवाद इस्लामलाच नव्हे तर ज्यू धर्म आणि ख्रिश्चन धर्मालाही लागू पडत नाही. काही ख्रिश्चन सूफी संतांनी आपल्या आध्यात्मिक घटनांचा अर्थ सांगण्यासाठी निश्चितच अद्वैतवादी भाषेचा प्रयोग केला आहे. परंतु हा दृष्टिकोन ख्रिश्चन धर्मालाही लागू पडत नाही. जैन धर्म आणि बौद्ध धर्माची विचारसरणी खात्रीने अद्वैतवादी नाही. सामान्यत: उपनिषदांची विचारधारा त्याला अवश्य म्हटले जाऊ शकते. परंतु हे विसरायला नको की उपनिषदांचा अद्वैतवाद हिंदू योगींच्या आध्यात्मिक अनुभवांची परिणती आहे. हिंदू धर्माची व्याख्या नव्हे. ती विशिष्ट श्रद्धा-तत्त्वे आणि पूजा-अर्चनेच्या खास पद्धती आणि ती नैतिक मूल्ये व सामाजिक व्यवस्थांद्वारे ऐतिहासिक हिंदू धर्म बनला आहे. त्यातल्या कोणत्याही गोष्टीचा संबंध उपनिषदांच्या अद्वैतवादाशी नाही. या दृष्टिकोनाने ना त्यांना निर्माण केले आहे आणि ना त्यांच्या रचनेत याचा काही हातभार आहे. सर्वधर्मसमभावाचा दृष्टिकोन सूफी मत आणि तत्त्वज्ञानाची निर्मिती आहे. सूफी संतांच्या 'कल्ब' (हृदया)वर एका खास अवस्थेत ज्या घटना घडतात, हा दृष्टिकोन त्यांचे भाष्य होय. जेव्हा सूफी या अवस्थेतून निघून पुढच्या अवस्थेत पाऊल ठेवतो तेव्हा त्याला सत्य, अद्वैतवादी नव्हे तर एका वेगळयाच रंगात दिसू लागते. या अवस्थेत सृष्टीनिर्माता आणि सृष्टी यातले अंतर उघडरीत्या समोर येते आणि धर्मासंबंधीची जी व्याख्या पैगंबरांनी (ईश दूतांनी) केली आहे ती खरी दिसून येते. इस्लामच्या मोठमोठ्या सूफी संतांच्या दृष्टीत अद्वैतवाद वस्तुस्थितीचे यथायोग्य भाष्य नव्हे तर सूफीच्या अपरिपक्वतेचे प्रमाण होय.

एका मध्यावस्थेला आध्यात्मिक यात्रेचा अखेरचा टप्पा समजून घेण्याची जी चूक काही मुस्लिम सूफी संतांकडून घडली आहे, तशीच चूक उपनिषदांच्या योगींकडूनही घडली आहे.

जे लोक अद्वैतवादाच्या श्रद्धातत्त्वांना धर्माचे उभयनिष्ठ तत्त्व म्हणतात, ते योग आणि सूफीवाद आणि धर्म यांच्यातल्या मूलभूत फरकाबाबत अनभिज्ञ आहेत. प्रत्येक धर्म 'सत्य'संदर्भात एक विशिष्ट दृष्टिकोन, चांगल्या-वाईटाचा एक विशेष आदर्श आणि परिणाम तसेच जीवनाच्या संरचनेचे एक वेगळे चित्र बाळगतो. आणि इतर दृष्टिकोनांना, आदर्शांना व चिन्हांना चुकीचे किंवा निदान अपूर्ण ठरवितो. हीच बाब त्याच्या वेगळया अस्तित्वासाठी व कायम राहण्यासाठी आधारभूत बनते. योगींनी व सूफी संतांनी सर्वधर्मसमभावाचे रचलेले दृष्टिकोन, एखाद्या विशिष्ट सत्याबाबतचे दृष्टिकोन, नीतिमत्तेचा आदर्श आणि जीवनचित्र बाळगत नाहीत. आणि ना त्यांच्यात त्यांना निर्माण करण्याची योग्यता असते. ते एका स्वराने प्रत्येक दृष्टिकोनाला योग्य, प्रत्येक आदर्शास विशुद्ध आणि प्रत्येक व्यवस्थेला सत्य ठरवितात आणि दुसऱ्याच स्वरात प्रत्येकाला त्रुटीपूर्ण, चुकीची व असत्य ठरवितात. खरे पाहता, त्यांच्या नजरेत योग्य-अयोग्य, चांगले-वाईट आणि खरे-खोटे यातल्या तारतम्याला वाव नसतो. सर्वधर्मसमभावाचा दृष्टिकोन धर्मांच्या दरम्यान उभयनिष्ठ तत्त्वांचा शोध नाही, उलट मुळापासून धर्मालाच खोटे ठरविणे (Falsification) होय.

धर्मांच्या दरम्यान वैचारिक एकतेच्या प्रयत्नाचे एक दुसरे उदाहरण एक युरोपियन सूफी स्वभावाचे विद्वान एफ. शैवून यांचे 'The Transcendental Unity of Religions' हे पुस्तक होय. शैवूनच्या मते सत्य दोन प्रकारचे असते. अलौकिक आणि धार्मिक. अलौकिक सत्य एक आहे आणि धार्मिक सत्य अनेकानेक. परंतु ही सर्व धार्मिक सत्ये त्याच एका अलौकिक सत्याची वेगवेगळी रूपे आहेत. शैवूनचे अलौकिक सत्य डॉ. भगवान दास यांच्या अद्वैतवादी सत्याहून वेगळे नाही. शैवूनला हे मान्य आहे की अलौकिक सत्य धार्मिक सत्याहून वेगळी अशी बाब आहे. परंतु त्यांना यातल्या फरकाचा उचित विवेक नाही. जर हा फरक त्यांना उचितरीत्या कळला असता तर त्यांनी धार्मिक सत्यांना अलौकिक सत्याची भिन्न रूपे आणि प्रादुर्भाव ठरविले नसते. तुम्ही अलौकिक सत्य म्हणा किंवा अद्वैतवादी सत्याचे नाव द्या. दोघांचीही आधारशिला सूफीवादाच्या अवलोकनावर आहे, ज्याचा संबंध ऐतिहासिक धर्माशी मुळीच नाही.

धर्म आणि राष्ट्रीय एकात्मता :

धर्मांच्या दरम्यान सैद्धान्तिक एकरूपता शोधण्याच्या इतर प्रयत्नांचा उल्लेख करणे व्यर्थ आहे आणि या संक्षिप्त लेखात संभवही नाही. परंतु प्रश्न हा उद्‌भवतो की, या प्रयत्नाची गरजच काय? काय त्या सर्वसामान्य नैतिक मूल्यांमध्ये सहमत व एकता, ज्यांचा उल्लेख मी विस्तारपूर्वक लेखाच्या सुरुवातीस केला आहे. विभिन्न धर्माच्या लोकांना एकमेकांच्या जवळ आणण्यासाठी मानवतेच्या नात्याने जोडण्यासाठी, शांती-समाधानाने राहण्यासाठी, निष्ठा व स्नेहप्रेमाने वागण्यासाठी, न्याय, दया आणि त्यागपूर्ण सद्‌व्यवहार करण्यासाठी, एकमेकांच्या धार्मिक रीतिरिवाजांचा, आदरणीय व्यक्तींचा आणि धार्मिक चिन्हांचा व प्रतीकांचा आदर राखण्यासाठी तसेच आपसात सलोखा राखून एका शांतीपूर्ण, सभ्य समाजाच्या निर्मितीसाठी पर्याप्त नाही? आमचा दृढ विश्वास आहे की, ही परस्परसदृश उच्च मानवीय मूल्ये एक सदाचारी मनुष्य, एक जबाबदार नागरिक आणि एका शांतीप्रिय समाजाची खरी हमी आहे. मात्र या अटीवर की प्रत्येक धर्माच्या अनुयायींनी त्या नीतिमूल्यांचा मन:पूर्वक अंगीकार करावा आणि ही मोठी महत्त्वपूर्ण अट आहे. धार्मिक लोक जर त्या मूल्यांना, जी त्यांच्या आपल्या धर्माची वास्तविक शिकवण आहे, आपल्या जीवनात ते स्थान देतील जे त्यांच्या धर्माने त्यांना देऊ इच्छिले आहे तर आमच्या समाजात सर्वत्र शांतीचे साम्राज्य पसरेल.

भारतात राष्ट्रीय सौजन्य आणि एकात्मता एक समस्या बनली आहे. बहुतेक लोक जाती आणि भाषांप्रमाणे धर्मांच्या अनेकतेलाही राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातला अडथळा समजू लागले आहे. काही लोक या समस्येचे समाधान सर्वधर्मसमभावाच्या धारणेत शोधतात, परंतु ते हे जाणत नाहीत की सर्वधर्मसमभावाचा दृष्टिकोन कोणत्याही धर्माचा पर्याय बनू शकत नाही. ज्या प्रकारे अनेक भाषांवरील उपाय हा नव्हे की आम्ही त्यांच्या दरम्यान 'एक परस्परसदृश भाषा' शोधून काढावी किंवा वेगवेगळया भाषांमधून काही अंश घेऊन एक संमिश्र भाषा तयार करावी. तद्वतच अनेक धर्मांवरील उपाय हा नव्हे की आम्ही त्यांच्यातून एक 'समन्वय साधक धर्म' स्थापण्याचा प्रयत्न करावा किंवा प्रत्येक धर्माचा एकेक अंश घेऊन एक नवा 'ईश-धर्म' तयार करावा.

काही प्रगतिशील वर्ग धर्मांच्या अधिकतेहून पुढे जाऊन धर्माच्या आत्म्यालाच मतभेदाचे कारण दर्शवितात. त्यांच्या मते खुदा किंवा भगवानाचे नाव उच्चारणेच दुफळी

किंवा उपद्रवाला आमंत्रण देणे होय. अर्थात अशा लोकांना धार्मिक विवादात समेट घडवून आणण्यात काही स्वारस्य नाही. प्रत्येक धर्माला मुळासकट उपटून काढणे हेच आपले कार्य असल्याचे ते मानतात. यास्तव त्यांच्यापैकी बहुतेक जण आणि त्यांचे गट धार्मिक विवादांना खतपाणी घालतात आणि सांप्रदायिक दंगे घडत असताना सक्रिय दिसून येतात. यासाठी की, अशा प्रकारे धर्माला बदनाम करता यावे आणि धार्मिक शक्तींना कमकुवत केले जावे. हा समूह भारताला त्याच्या सहस्त्रावधी वर्षांच्या प्राचीन धार्मिक परंपरांपासून विभक्त करून अधार्मिकतेच्या मार्गावर चालवू इच्छितो. त्याला ही जाणीव नाही की धर्माची मुळे मानवी स्वभावाच्या अगदी खोलवर इतकी रुजली आहेत की कोणाला ती उपटून काढणे शक्य नाही. आज साऱ्या जगात धर्माला जिवंत करण्याचा जो प्रयत्न चालला आहे आणि ज्याच्या प्रभावाने त्यांचा स्वत:चा तांबडा स्वर्गही सुरक्षित नाही, तेवढ्यानेही हे लोक धडा घ्यायला तयार नाहीत.

ना धर्म सौजन्य आणि एकात्मतेच्या मार्गातला अडसर आहे आणि ना धर्मांची अनेकता. जी गोष्ट खऱ्या अर्थाने अडसर आहे, ती अधार्मिकता आणि धर्माशी शत्रुत्वाचे प्रयत्न होय, जी धर्माच्या नावावर मोठ्या निर्लज्जपणे सध्या केली जात आहे. धर्माच्या नावाने जे भांडण-तंटे होतात, त्यांच्या पाठीशी एखादी धार्मिक भावना कार्यरत नसते, तर काही तुच्छ, वैयक्तिक आणि सामुदायिक हेतू आणि काही विशुद्ध भौतिक व राजकीय लाभ साध्य करणे या गोष्टी असतात. भांडणाचा आरंभ बाह्यत: एखाद्या मामुली घटनेने होतो, जिला लोकांनी जर आपापल्या धर्माच्या वास्तविक शिकवणींच्या प्रकाशात सोडविण्याचा प्रयत्न केला तर या लहानसहान क्षुल्लक घटना वाढत जाऊन सांप्रदायिक दंग्यांचे भीषण रूप धारण करू शकणार नाहीत. त्या ठिणगीला जी गोष्ट ज्वलंत निखारा बनविते आणि ज्यामुळे धगधगणाऱ्या आगीचा उद्रेक होऊन त्या भीषण आगीत अनेक मनुष्य वस्त्या आणि बहुमूल्य मनुष्यजीवांचा नाहक बळी पडतो, ती म्हणजे अधार्मिकता आणि धार्मिक शत्रुत्वाचे ते योजनाबद्ध प्रयत्न होत, जे धर्माचा मुखवटा घालून केले जातात आणि ज्यांचा एक मात्र उत्प्रेरक संपत्ती आणि सत्तेशी संबंधित स्वार्थ असतो. हे प्रयत्न कदापि कोणत्याही धर्माच्या प्रतिष्ठेचे लक्षण नाही, उलट अवनती व अपमानास कारणीभूत ठरतात.

धर्मानुयायांच्या दरम्यान मतभेदांची कारणे :

धर्मानुयायांच्या दरम्यान मतभेद आणि संघर्षाची काही इतर कारणे आहेत:-

पहिले आणि मौलिक कारण हे की आमच्यापैकी काही लोक आणि काही गट हे मान्य करण्यास तयार नाहीत की भारत केवळ एक धर्माच्या अनुयायांचा नव्हे तर अनेक धर्मांच्या अनुयायांचा देश आहे, जे या देशात शतकानुशतके वास्तव्य करीत आलेत. हे लोक या देशाला आपला वैयक्तिक वारसा समजतात आणि इतरांना विदेशी म्हणतात. त्यांनी भारतीयत्वाच्या ज्या अटी मांडल्या आहेत, त्यांचा सारांश हा की जोपर्यंत इतर लोक त्यांच्या धार्मिक परंपरांना आपली परंपरा आणि त्यांच्या धार्मिक विभूतींना आपल्या विभूती म्हणून स्वीकारत नाहीत, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जोपर्यंत त्यांच्या धर्माच्या प्रत्येक अंशावर मनोभावे श्रद्धा ठेवत नाहीत तोपर्यंत ते भारतीय म्हणवून घेण्यास पात्र नाहीत. त्यांच्या विचारानुसार भारतीय म्हटले जाण्याकरिता या देशाशी एकनिष्ठता आणि प्रेम पुरेसे नाही. उघड आहे, असल्या प्रकारच्या वैचारिक वातावरणात देशात कधीही शांती सुबत्ता नांदू शकणार नाही.

दुसरे कारण असे की, काही लोक चुकीने हा विचार करू लागले आहेत की त्यांचे आपल्या धर्माला सत्य समजणे, आपल्या रीतिरिवाजांना व नियमांना प्रतिष्ठित समजणे आणि आपल्या परंपरांचा व थोर ज्येष्ठ व्यक्तींचा आदर-सन्मान करणे या गोष्टीची अपेक्षा करतो की त्यांनी आपला धर्म इतरांवर लादावा आणि आपल्या उपासना पद्धतींना इतरांना बलपूर्वक मान्य करण्यास भाग पाडावे. आणि हे संभव नसल्यास त्या इतर लोकांच्या धारणांवर टोमणे मारावेत, उपरोध करावा. त्यांच्या उपासना स्थळांचा अनादर करावा आणि त्यांच्या थोर विभूतींची थट्टा उडवावी. वास्तविक या दोन गोष्टीत कसलाही ताळमेळ नाही. मी जर एखाद्या धारणेला योग्य आणि दुसऱ्या धारणेला चुकीची समजतो तर अशाने मला हा अधिकार कसा प्राप्त होतो की मी इतरांच्या श्रद्धा व धर्माची थट्टामस्करी करावी? जर मी आपल्या रीतिरिवाजांना अधिक चांगले आणि इतरांच्या रीतिरिवाजांना चांगलेही समजत नाही तर अशाने हे संयुक्तिक व न्यायसंगत कसे ठरते की मी आपल्या पद्धतींना इतरांवर जबरदस्तीने लादावे? जी कोणी व्यक्ती किंवा समूह असे करेल तो केवळ मानवजातीला आणि लोकतंत्रानाच नव्हे तर स्वत: आपल्या धर्ममूल्यांना मूठमाती देईल.

तिसरे कारण हे की, आमच्यापैकी अधिकांश असे आहेत, जे स्वत:करिता ज्या अधिकारांची अभिलाषा बाळगतात, ते अधिकार दुसऱ्यांना द्यायला तयार नसतात. उदाहरणार्थ, आम्ही हे इच्छितो की आमच्या प्राणसंपत्तीचे संरक्षण व्हावे. आमच्या मानमर्यादेला ठेच पोहोचू नये, आम्हाला शिक्षण आणि उन्नतीची प्रत्येक संधी लाभावी, लहानमोठ्या हुद्यांवर आमचेच लोक असावेत, आम्हाला आपल्या धर्माच्या प्रचार व प्रसाराचे पुरेपूर स्वातंत्र्य असावे, आपल्या मुलाबाळांना आपल्या धर्माचे शिक्षण देण्याची संधी लाभावी, आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक संस्था स्थापित करण्यासाठी आणि त्या चालविण्यासाठी तसेच आपल्या भाषेला अध्ययन-अध्यापनात आणि तिला अधिक विकसित करण्यासाठी सर्व प्रकारच्या सोयी-सवलती मिळाव्यात, परंतु हेच अधिकार आम्ही दुसऱ्या धर्माच्या लोकांना द्यायला तयार नसतो. आम्ही स्वत: आपल्या अधिकारांपेक्षा जास्त प्राप्त करू इच्छितो. पण दुसऱ्यांना मात्र त्यांचा वैध अधिकार देणेही पसंत करीत नाही आणि आम्ही कधीही हा विचार करत नाही की आमचे हे आचरण न्यायाच्या विरुद्ध आहे, किंबहुना आपल्याच धर्माच्या सर्वोत्तम परंपरा आणि सर्वोच्च मूल्यांच्या विरुद्ध आहे. अशाने आमच्या धर्माची प्रतिष्ठा वाढत नाही, तर साऱ्या जगात तिला काळिमा लागतो.

माझ्या मते धार्मिक लोकांमध्ये मतभेद आणि वैमनस्याची हीच तीन मोठी कारणे आहेत. त्यावरील उपाय माझ्या दृष्टीने असा आहे,

१. आम्ही भारताला हिंदू , मुसलमान, शीख, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, पारशी आणि त्या सर्वधर्म-पंथांचा देश मानावा, जे अनेक पिढ्यांपासून या देशात वास्तव्य करीत राहिलेत. आम्ही मन:पूर्वक हे मानावे की आमच्या भारत देशात प्रत्येक धर्म आणि संप्रदायाला समान अधिकार प्राप्त व्हावा.

२. आपल्या धर्मांना, रीतिरिवाजांना, मूल्यांना, परंपरांना जबरदस्तीपूर्वक इतरांवर थोपवू नये. दुसऱ्यांच्या उपासना स्थळांचा, धार्मिक थोर पुरुषांचा, ग्रंथांचा, परंपरांचा, सणांचा आणि पद्धतींचा आदर-सन्मान राखावा. दुसऱ्यांचा धर्म, धार्मिक बाबी आणि थोर पुरुषांचा आदर राखण्याचा असा अर्थ मुळीच नाही की, आम्ही आपल्या धर्माच्या संदर्भात साशंक व्हावे. ना अशाने हा निष्कर्ष निघतो की आम्ही प्रत्येक धर्माला एक समान मानू लागावे आणि एकाला दुसऱ्याच्या तुलनेत प्राधान्य न द्यावे किंवा एखाद्या गोष्टीस उचित व

एखाद्या गोष्टीस अनुचित न ठरवावे. प्रत्येक मानवाला आपल्या गोष्टी योग्य आणि दुसऱ्याच्या गोष्टी अयोग्य समजण्याचा अधिकार प्राप्त आहे, परंतु कोणालाही हा अधिकार प्राप्त नाही की त्याने इतरांच्या गोष्टींचा अनादर व अवहेलना करावी.

३. आम्ही प्रत्येक माणसाचा हा अधिकार मान्य केला पाहिजे की तो एखाद्या धर्मावर निष्ठा राखण्यास किंवा एका धर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारण्यास स्वतंत्र आहे. त्याला आपल्या विचार आणि दृष्टिकोनास सामान्य नीतिनियमांच्या व लोकतांत्रिक मर्यादांच्या कक्षेत राहून व्यक्त करण्याचा आणि ह्या हेतुस्तव प्रचार-प्रसाराची सर्व माध्यमे-प्रेस आणि वृत्तपत्रे यांना प्रयोगात आणण्याचा, पुस्तके प्रकाशित करण्याचा आणि शाळा, मदरसे कायम करण्याचा समान अधिकार पोहोचतो.

४. शेवटची बाब अशी की, आपण आपल्या धर्माच्या सर्वसामान्य नैतिक मूल्यांना विसरू नये. त्यांना आपल्या धर्माचे मूळ आणि महत्त्वपूर्ण भाग समजावे. धर्म आणि समूहाचा फरक न करता त्यांचा प्रत्येक माणसाशी उपयोग करणे शिकावे. प्रत्येक माणसाची सेवा आणि त्याच्याशी प्रेम करण्यास आपले कर्तव्य जाणावे आणि कोणत्याही माणसावर अन्याय, अत्याचार करणे व त्याला क्लेश यातना पोहोचविणे महापाप समजावे. ही गोष्ट मनात चांगल्या प्रकारे रुजवावी की कोणा एका माणसाला अकारण त्रास यातना देऊन, त्याला त्याच्या वैध हक्कांपासून वंचित राखून, त्याच्या प्राण-वित्त-प्रतिष्ठेला हानी पोहोचवून आम्ही ना आपली सेवा करू ना आपल्या धर्माची आणि ना आपल्या देशाची. सत्य आणि न्यायाच्या विरुद्ध आमचे प्रत्येक पाऊल, मानवता, नैतिकता, धार्मिकता आणि आध्यात्मिकता वगैरे सर्व दृष्टीने चुकीचे आहे आणि आमच्या मुक्तीच्या मार्गात पर्वतासमान अडथळा आहे.

मला विश्वास आहे की जर प्रत्येक धर्माचे लोक, त्या गोष्टींना, ज्या त्यांच्या स्वत:च्या धर्माच्या शिकवणी आहेत, त्या अगदी मनापासून आत्मसात करतील, त्यांना स्वत: आचरणात आणतील आणि आपल्या बांधवांनाही आचरणात आणण्यास प्रवृत्त

करतील तर आम्ही एका चांगल्या, मजबूत, शांतिमय आणि सभ्य समाजाची निर्मिती करण्यात यशस्वी होऊ. या गोष्टींखेरीज अन्य कोणत्याही गोष्टींची गरज भासणार नाही.

इस्लाम आणि राष्ट्रीय एकात्मता :

जेथपावेतो इस्लाम धर्माचा संबंध आहे, तो राष्ट्रीय सौजन्य, सहमत आणि राष्ट्रीय एकात्मतासंबंधीच्या गोष्टींचे समर्थन करतो. इस्लामी दृष्टिकोनाने सर्वधर्म समानरीत्या आदर-सन्मानास पात्र आहेत. प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य ठरते की त्याने इतर धर्मांच्या प्रार्थनास्थळांचा, थोर व्यक्तींचा, ग्रंथांचा, रीतिरिवाजांचा आदर राखावा.

एखाद्या 'उपास्या'स नुकसान पोहोचविणे, एखाद्या धार्मिक विभूतीला बरे-वाईट म्हणणे, एखाद्या धर्मग्रंथाचा अवमान करणे इस्लामच्या दृष्टीने घोर पातक आहे. असे घृणित आणि वर्ज्य काम आज कोणी मुस्लिम करत असेल किंवा इतिहासात एखाद्या मुस्लिमाने कधीकाळी केले असेल तर अगदी चुकीचे आहे. हे कृत्य इस्लामी सिद्धान्ताच्या विरुद्ध आहे, त्याला इस्लामच्या नावाने पार पाडणे इस्लामचे अनुसरण अथवा सेवाकार्य नव्हे, उलट इस्लामला बदनाम व अपमानित करणे होय. यासंदर्भात कुरआन आणि हदीस (पैगंबर वचनां)मध्ये स्पष्ट आदेश दिला गेला आहे आणि इस्लामी कायद्यात यासंबंधी स्पष्ट कलमे आहेत. एखाद्या मुस्लिम बादशहाच्या कर्माने, एखाद्या काजी (न्यायाधीशा)च्या फैसल्याने, एखाद्या शासनाच्या आदेशाने किंवा एखाद्या मुक्तीच्या फतव्याने या सिद्धान्तात कसलाही बदल होणार नाही.

इस्लाम प्रत्येक माणसाला अधिकार आणि निवडीचे स्वातंत्र्य देतो. प्रत्येक धर्माच्या लोकांना आपल्या धर्मावर कायम राहण्याचा, त्याचा प्रचार करण्याचा, त्यासाठी शाळा विद्यालय उघडण्याचा, प्रेस आणि वृत्तपत्रादी सर्व प्रसारमाध्यमांना प्रयोगात आणण्याचा, ग्रंथ-पुस्तके, नियतकालिके प्रकाशित करण्याचा हक्कदार समजतो. धर्म-परिवर्तनासाठी इस्लाम एखाद्याला विवश करणे अवैध ठरवितो. यासंदर्भात पवित्र कुरआनचा आदेश आहे. 'ला इकरा-हा-फिद्दीन' (२:२५६) अर्थात धर्माबाबत कसल्याही प्रकारची जोर-जबरदस्ती वैध नाही. इस्लाम, धर्मांच्या चालीरीती, सण-उत्सव, संघटन आणि व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप करणे उचित समजत नाही. मुस्लिम राज्यकर्त्यांनी इस्लामी शिकवणींची अपेक्षा समजून आपल्या प्रजेतील इतर जातीधर्माच्या लोकांना त्यांच्या धर्मपालनात पूर्ण

स्वातंत्र्य दिले आहे. त्यांच्या व्यक्तिगत कायद्याचे रक्षण केले आहे. तो कायदा लागू करण्यासाठी त्यांच्याच जातीधर्माचे लोक नियुक्त केले आहेत आणि त्यांच्या तंट्याचा न्याय-निवाडा करण्यासाठी त्यांच्याच लोकांना न्यायाधीशपदावर नेमले आहे. ही कार्यशैली इस्लामच्या शिकवणी आणि त्याच्या उचित परंपरांशी अनुरूप आहे. त्याच्या उलट जर कुठे काही आढळते तर ते गैरइस्लामी आणि चुकीचे आहे.

इस्लाम प्रत्येक माणसाला एकाच माता-पित्याची संतान समजतो. समस्त मानवांना बांधव आणि मनुष्य या नात्याने सर्वांना समान लेखतो. ही गोष्ट केवळ मुस्लिमांपुरती मर्यादित नाही. तर प्रत्येक धर्म, प्रत्येक समूह, प्रत्येक देश आणि प्रत्येक श्रेणीचा मानव दुसऱ्या मानवाचा बांधव आणि त्याच्या समान आहे. मानव या नात्याने सर्वांचा प्राण, सर्वांची संपत्ती, सर्वांची अब्रू, सर्वांचा पंथ, सर्वांचा धर्म समानरित्या आदरणीय आहे. इस्लाम प्रत्येक अत्याचारास अत्याचारच म्हणतो, मग तो कोणाच्याही विरुद्ध असो किंवा कोणत्याही भावनेने केले जावे.

इस्लाम संपूर्ण मानवजातीला 'अल्लाहचा परिवार' संबोधतो आणि प्रत्येक माणसाच्या सेवेला अल्लाहची उपासना ठरवितो, मग तो माणूस मुस्लिम असो वा इतर कोणी असो. आपला शेजारी, आपली गल्ली, आपले शहर आणि आपल्या देशाच्या लोकांचा हक्क दुसऱ्यांच्या तुलनेत अधिक असल्याचे दर्शवितो. त्याग-बलिदान, उपकार आणि सद्व्यवहार मग तो कोणत्याही माणसाकरिता असो, इस्लामच्या दृष्टीने अनेकविध उपासनांपेक्षा श्रेष्ठ आहे आणि अल्लाहशी प्रेम आणि त्याचे सान्निध्य प्राप्त करण्याचे फार मोठे साधन आहे.

बांधवांनो!

उचित वाटते की या गोष्टींच्या समर्थनार्थ पवित्र कुरआन आणि पैगंबर वचनांमधून काही वचनांना सादर करावे आणि यासोबतच आपल्या वक्तव्याचा समारोप करावा.

* लोकांनो! एकमेकांविषयी वाईट धारणा बाळगू नका, एकमेकांच्या टेहळणीत राहू नका, एकाच्या विरोधात दुसऱ्याला भडकावू नका, एकमेकांचा द्वेष-मत्सर करण्यापासून अलिप्त राहा, एकमेकांवर मात करू नका. अल्लाहचे दास आणि आपसात बंधुभाव बाळगून राहा. (हदीस)

* ती व्यक्ती मुस्लिम नाही, जिचा शेजारी तिच्या अत्याचार आणि उपद्रवापासून सुरक्षित नसेल. (हदीस)

* एखाद्याला अन्यायी व अत्याचारी जाणत असताना त्याला साथ देऊ नका. (हदीस)

* तुमची मैत्री आणि शत्रुत्व अल्लाहकरिता असले पाहिजे. (हदीस)

* अयोग्य गोष्टींबाबत आपल्या जातीचे समर्थन करणे असे होय. जसे तुमचा उंट विहिरीत पडत असावा, तर तुम्हीही त्याचे शेपूट धरून त्याच्यासह जाऊन पडावे. (हदीस)

* एखाद्या समूहाचे शत्रुत्व तुम्हाला या गोष्टीस प्रेरित न करावे की तुम्ही त्याच्यावर अन्याय करावा. (कुरआन)

* न्याय करा की हीच गोष्ट धर्मपरायणतेशी अति निकट आहे. (कुरआन)

* धर्माच्या बाबतीत कसलीही जबरदस्ती वैध नाही. (कुरआन)

* अल्लाहला सोडून ज्या ईश्वर (दैवतां)ना लोक आर्जव करतात, त्यांना कदापि भले-बुरे बोलू नका. (कुरआन)

* इतरांसाठी तेच पसंत करा, जे तुम्ही स्वत:साठी पसंत करता. (हदीस)

* मी तुम्हाला अल्लाहच्या अवज्ञेपासून दूर राहण्याची, सत्य बोलण्याची, वचनपूर्ती करण्याची, अनामतीस यथायोग्य पोहोचविण्याची, बेइमानी न करण्याची, अनाथावर दया करण्याची, शेजाऱ्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याची, क्रोधावर काबू राखण्याची, लोकांशी मृदू शैलीत बोलण्याची आणि त्यांच्या क्षेमकुशलतेसाठी दुआ करण्याची वसीयत करतो. (हदीस)

* तुम्ही तो उत्तम जनसमूह (उम्मत) आहात, ज्याला विश्ववासीयांच्या भलाईकरिता उभारले गेले आहे. तुमचे कार्य भल्या गोष्टींचा आदेश देणे आणि वाईट गोष्टींपासून रोखणे होय. (कुरआन)

* सत्कर्म आणि ईशभीरूतेच्या कामांमध्ये हातभार लावा आणि दुष्कर्म व अत्याचाराच्या कामांत सहयोग देऊ नका. (कुरआन)

- समाप्त -